Vol 4 Issue 5 Feb 2015 ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

*Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Vol. 4 | Issue. 5 | Feb. 2015
Available online at www.ror.isrj.org

# छत्रपती शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन

*कल्पना राजीव मोहिते*

इतिहास विभाग प्रमुख– असोसिएटस प्रोफेसर , यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य
महाविदयालय इस्लामपूर.

***सारांश :–*** 17 व्या शतकात हिंदुस्थनच्या इतिहासात क्रांती झाली ही क्रांती म्हणजे छत्रपती शिवरायांनी सहयाद्रीच्या कुशीत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवरायांचे कर्तृत्व म्हणजे हिंदुस्थानचा जिवंत व प्रेरणादायी असा इतिहास. शिवरायांचे चरित्र सर्वच अर्थानी अलौकिक असेच आहेण त्यांच्या जीवनातील प्रत्येक धोरणाला नैतिकतेचा परिसस्पर्श झाला आहे जात पात, पंथ, भेदाभेद यापलिकडे जाऊन राजांचे प्रत्येक धोरण हे मानवतेच्या भूमिकेतून राबविलेले दिसते म्हणून ख–याअर्थाने छत्रपती शिवराय 'युगपुरूष' ठरतात[1].

## *प्रस्तावना :–*

शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या महत्वपूर्ण कार्याबरोबरच स्वधर्मरक्षण, सर्वधर्म सहिष्णूतेचे धोरण, प्रशासन व्यवस्था, न्यायव्यवस्था, मुलकी व्यवस्था, शिस्त, लष्करी व्यवस्था इ. सर्वच बाबतीत राजांनी राबविलेली धोरणे आदर्शवत अशीच आहेत. वरील सर्वच ठळक बाबींबरोबर राजांचा स्त्रीयांच्या विषयीचा दृष्टीकोनही सद्यस्थितीत लोकशाही राष्ट्राला आदर्शवत व प्रेरणादायी असाच आहे.

पुरूषप्रधान संस्कृती असलेल्या आमच्या लोकशाही राष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीयांना कायदयाने समानतेच्या दृष्टीकोनातून अनेक अधिकार मिळाले. न्याय गोष्टी स्त्रीयांच्या बाजूने झाल्या पण प्रत्यक्ष तिला मिळणारी वागणूक काही अंशी दुयमच आहे दिवसाढवळया स्वकीयांकडूनच स्त्रीयांवर होणारे अत्याचार, त्यांची अवहेलना, असुरक्षितता या बाबी पाहता छत्रपती शिवरायांच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनांची, त्याबाबतीत त्यांनी घेतलेल्या अनेक निर्णयांची आज लोकशाही राष्ट्राला गरज आहे असे वाटते म्हणून छत्रपती शिवरायांच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाचा आढावा या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## *शिवकालातील स्त्रीयांची सामाजिक स्थिती –*

छत्रपती शिवरायांचा दृष्टीकोन पाहता तत्कालीन स्त्रियांची असणारी सामाजिक स्थिती पाहणे क्रमप्राप्त ठरते. म्हणजेच त्यांनी घेतलेल्या निर्णयांचे महत्व लक्षात येते. तत्काळात पुरूषप्रधान संस्कृती होतीण कुटूंबात स्त्रीचे स्थान दुययमच होते. बालविवाहाची प्रथा रूढ होती. 8 वर्ष वयाच्या आत मुलीचा विवाह करणे योग्य समजले जाई कधी कधी विषम विवाह केले जात. बालिकेचा विवाह एखादया वृध्दाशी लावून दिला जाई व लवकरच ती बालविधवा होई. अशा अकाली वैधव्य आलेल्या स्त्रीला जबरदस्तीने सती घालविले जाई. अथवा वैधव्याच्या खाईत यातना भोगत जीवन कंठावे लागे. पुर्नविवाहाचा अधिकार तिला नव्हता. राजघराण्यातील स्त्रियांचा अपवाद वगळता शिक्षणाचा अधिकारही स्त्रीला नाकारलेला होता. मराठे काळात स्त्रीचे स्थान गौणच होते. स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तूच समजली जाई. सरंजामशाहीच्या काळात गोरगरीब स्त्रियांच्या अब्रूला किंमत नव्हती. जहागीरदार, वतनदार, सरदार, पाटील, देशमुख, राजेरजवाडे या सर्वाच्या दृष्टीकोनातून गोरगरीबांच्या लेकीबाळी हव्या तेव्हा उपभोगण्याच्या वस्तू. ज्यांनी रक्षण करायचे तेच अब्रूची लूट करत होते. तेव्हा दाद कुणाकडे मागणार[2].

तत्कालीन परिस्थितीत इस्लामी लष्करी छावण्याबरोबर कलावंतिणी, गायिका व वेश्या इ. ना बरोबर नेले जाई. त्यांचे लष्कर म्हणजे डामडौलच असे पण राजांनी मात्र आपल्या लष्करात घालून दिलेले नियम पाहता लष्करी मोहिमेमध्ये स्त्रिया, कलावंतिणी, वेश्या, नर्तकी, दासी आणू नयेत असा राजांचा दंडकच होता[3] व युध्दमोहिमे दरम्यान शत्रुच्याही स्त्रियांचा आदर करावा त्यानुसार "लष्करात बायको व बटकीन, कलावंतीन नसावी जो बाळगील त्याची गर्दन मारावी पर मुलकात बायका पोर न धरावी.[4] फ्रँको मार्टिन म्हणतो' राजांच्या मोहिमेत स्त्रिया नसत[5].

राजांच्या आज्ञांचे पालन न केल्यास गुन्हेगाराला कठोर शिक्षा होत असे. राजांच्या स्त्रीविषयक असलेल्या मानवतेच्या

भूमिकेबाबत मोगल इतिहासकार खाफीखानानेदेखील गौरवोद्‌गार काढलेले आहेत तो म्हणतो, 'कुराण, मशिद आणि स्त्रिया यांचा अवमान सैनिकांनी केव्हाही करता कामा नये असा राजाचा दंडक होता[6]. कोणत्याही धर्माची स्त्री असो सैनिकांनी तिला पकडून आणले असेल तर त्या स्त्रीचा योग्य तो सन्मान करून तिला तिच्या नातलगांकडे पोहोचविले जाई अशी ग्वाही खाफीखानाने दिलेली आहे[7]. शत्रूपक्षातील लेखकाने राजांच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाबद्‌दृल काढलेले हे गौरवोउद्‌गार त्यांच्या स्त्रीविषयक असलेल्या न्यायप्रिय भूमिकेची स्त्रीविषयक दृष्टीकोनाची साक्ष देतात् म्हणजेच राजांनी स्त्रीयांना नेहमीच योग्य ते स्थान व त्यांचा सन्मान करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. जो कुणी स्त्रियांच्यावर अत्याचार करेल त्याला गंभीर शिक्षा केल्याची अनेक उदाहरणे सापडतात.

मुसे खो.यातील रंगो त्रिमल वाकडे याने विधवा ब्राम्हण स्त्रीशी बदकर्म करून तो चंद्रराव यशवंतरावांच्या आश्रयाला गेला. तेव्हा चारित्र्य व न्याय या गोष्टींचे काटेकारेपणे पालन करणा.या राजांच्या कानावर ही गोष्ट गेल्यानंतर त्यांनी रंगो त्रिमलला पकडून शिक्षा केलेली आहे व त्याला आश्रय देणा–या चंद्ररावाचाही पाडाव केला आहे[8].

### *रांझे गावचा बाबाजी गुजर पाटील या गुन्हेगाराला शिक्षा*

छत्रपती शिवरायांनी आपला राज्यकारभार करत असताना अन्याय करणा–याची कधीच गय केली नाही. नेहमीच रयतेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला [9] स्त्रीयांच्यावर अत्याचार करणा.याला तर त्यांनी त्वरीत कठोर शिक्षा केल्याची वरीलप्रमाणे अनेक उदाहरणे आहेत उदा. खेडबा.यातील रांझे गावचा बाबाजी गुजर पाटील याने एका स्त्रीवर बलात्कार केल्याची तक्रार राजांकडे आल्यावर चौकशी करता त्याच्यावर गुन्हा शाबीत झाल्यानंतर राजांनी त्याचा चौरंगा (हातपाय तोडणे) करण्याची आज्ञा केली. त्याचे पाटीलकीचे वतन जप्त करून त्याला 300 होनांचा दंड केला [10].

वरील उदाहरण पाहता गावच्या लोकांचा रक्षणकर्ता पाटलानेच गावच्या स्त्रीयांच्या अब्रूला हात घातल्यावर राजांनी त्याची गय केली नाही. सद्यस्थितीत स्त्रीयांच्यावर अत्याचार करून गुन्हेगार राजरोसपणे मोकाट हिंडताना दिसतात. लोकशाही राष्ट्रात स्त्रीयांची होत असलेली अवहेलना पाहात राजांच्या न्यायप्रियतेची कल्पना येते

### *दादाजी शिवथरकर याला डोळे काढण्याची शिक्षा व कैद*

अजून एक उदाहरण पाहता शिवथर येथील दादाजी शिवथरकर यांने बद.अंमल् (परत्रीगमन) केला. चौकशीअंती गुन्हा सिध्द् झाल्यावर राजांनी त्याचे डोळे काढण्याची शिक्षा फर्माविली व त्याला एका किल्ल्यावर कैदेत ठेवले[11]. असे गुन्हे करणा.याला राजांच्या स्वराज्यात त्वरीत शासन होत असे.

### *कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा सन्मान*

शिवरायांच्या स्वराज्यात परस्त्रीकडे वाईट नजरेने पाहणा–यांची गय केली जात नसे. 1656 साली कल्याणचा आदिलशाही सुभेदार मुल्लाना महंमद आपले कुटूंब इथेच ठेऊन खजिना घेऊन विजापूरला गेला होता. आण्णाजी दत्तोने सुभेदाराच्या तरूण सुंदर सुनेला पकडून आणले व राजांच्या समोर दरबाबरात हजर केले त्यावेळी राजांच्या तोंडून आलेले उद्‌गार त्यांच्या नीतिमत्तेची साक्ष देतात, राजांनी यावेळी त्या स्त्रीशी गैरव्यवहार न करता ते म्हणतात, 'आमची आईही अशीच सुंदर असती तर आम्हीही असेच सुंदर झालो असतो'[12]

तत्कालीन परिस्थितीत राज्यकर्ते, जहागीरदार, सरंजामदारांकडून स्त्रीयांवर होत असलेले अत्याचार पाहता राजांनी पर स्त्रीबद्‌दल काढलेले हे उद्‌गार त्यांच्याकडे स्त्रीयांप्रती असणा.या आदराची साक्ष देतात. एवढेच नव्हे तर राजांनी सुभेदाराच्या सुनेला चोळी बांगडी देऊन तिची पाठवणी केली यावरून रॉलीन्सनने म्हटल्याप्रमाणे महाराज स्त्रिया, लहान मुले व बिनलढाऊ लोकांचा मान करीत [13]. मग ती कोणत्याही जातीची असोत. एलफिन्स्टने राजांना चारित्र्य संपन्न कुशल सेनापती आणि कर्तृत्ववान राजनीतीज्ञ म्हटले आहे ते सार्थ आहे.

### *माहूरची राणी रायबागीणचा आदर*

शाहिस्तेखानाने स्वराज्यावर स्वारी केली तेव्हा 1661 च्या दरम्यान त्याने कारतलबखानास कोकण घेण्यास पाठविले. तेव्हा त्याच्या या स्वारीमध्ये माहुरचे सरदार उदाजीराजे देशमुख यांची विधवा स्त्री राणी रायबागीणही मोगलांच्या वतीने सहभागी होती . कारतलबखान खिंडीत मराठयांना सापडून शरण आला. तेव्हा शत्रूच्या पक्षातील राणी रायबागीणला मात्र राजांनी कोणताही त्रास न देता तिचा साडीचोळी देऊन सन्मान केला[14]. म्हणजेच लूट करताना अथवा लढाईत कोणत्याही धर्माच्या स्त्रिया हाती आल्या तर त्यांना तोषिस ;त्रासद्ध लागता कामा नये अशा राजांच्या सैनिकाना सक्त आज्ञा असत हे राणी रायबागीणच्या उदाहरणावरून सिध्द होते.[15]

### *सावित्रीबाई देसाई यांचा सन्मान*

राजांच्या न्यायप्रियतेची साक्ष देणारे अजून एक उदाहरण पाहता महाराज कर्नाटक मोहिमेवरून 1678 साली परत येत असताना बेळगावजवळ बेलेवाडी येथे सावित्रीबाई देसाई ही स्त्री किल्लेदार होती. या सावित्रीबाईबरोबर मराठयांनी 27 दिवस लढाई केल्यानंतर तिचा किल्ला ताब्यात आला. परंतू मराठा सेनानी सखुजी गायकवाड याने पराभूत झालेल्या सावित्रीबाईवर बलात्कार केला, हे जेव्हा शिवरायांना समजले तेव्हा त्यांनी त्वरीत सखुजीला शिक्षा करून त्याचे डोळे काढण्याची आज्ञा दिली.[16] थोडक्यात शिवकाळात स्त्रियांवर अत्याचार करण्या.या कोणत्याही गुन्हेगाराची महाराजांनी गय केलेली नाही. त्याला त्वरीत शासन करून जरब बसविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### *गोळेवाडीकरांच्या सुनेचा आदर*

वाईजवळ गोळेवाडी येथील गोळेकरांनी मराठयांच्या विरोधात बंड पुकारल्यानंतर त्यांची पळून गेलेली गोळेवाडीकरांची सून प्रतापगडाच्या पायथ्यापाशी लपून बसली होती एका ब्राम्हण सरदाराच्या ती हाती लागल्यावर त्यांनी तिला महाराजांपुढे हजर केले असता राजांनी तिचाही सन्मान करून पाठवणी केली 17 व तिला पकडून आणणा.यांवर जरब बसविली. अशा कितीतरी उदाहरणावरून अत्याचार करणा.याला शासन करण्यात महाराजांनी कधीच विलंब केला नाही

### *हिरकणीचा गौरव*

. त्याचबरोबर चांगले काम करणा.यांचा गौरव करून शाबासकी देण्यातही महाराज नेहमीच दक्ष असत. उदाहरण पाहता रायगडाचे दरवाजे बंद झाल्यावर बाळाच्या ओढीने गडावरून अंधा.या रात्री अवघड कडा उतरून गेलेल्या बहादूर, धाडसी हिरकणीचा दरबारात बोलावून तिला साडी–चोळी देऊन तिचा सत्कार करणारे महाराज म्हणजे स्त्री समानतेचा गौरव कितीतरी वर्षे अगोदर करणारे आदर्श राज्यकर्ते ठरतात [18] .

### *सूरत लूटीतील नीतीमत्ता*

त्याचबरोबर सूरत लूटीच्यावेळी मोहनदास पारेख नावाचा दानशूर दलालाचा मृत्यू झाला होता.तो नितीमान व धर्मशिल होता. त्याची किर्ती राजाच्या कानावर गेल्यामुळे राजांनी त्याच्या विधवा स्त्री अथवा वाडयास त्रास दिला नाही ही राजाची युध्दनिती होती [19].

### *समारोप –*

आज 21 व्या शतकात लोकशाही राष्ट्रात अनेक बाबतीत आपले कर्तृत्व सिध्द केलेल्या आजच्या भारतीय स्त्रीची अवस्थाही मध्ययुगीन मराठा काळासारखीच झाली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आजची स्त्री सुरक्षित नाही. अत्याचार ग्रस्त स्त्रीला आमच्या कायदयाची कासवगती तिला त्वरीत न्याय मिळवून देत नाही. जलदगती न्यायालयांची निर्मिती झाली पण अपवाद वगळता शेकडो स्त्रीयांची अब्रू रोजच लुटली जात आहे. जाणीव शून्य झालेला समाजदेखील वाचण्या, पाहण्यापलीकडे फारसे कुणी काही करीत नाही. अत्याचार करणारे कधी कधी स्त्रीच्या रक्तामासातले देखील असतात. अनेकवेळा गुन्हा करूनही नराधम सहीसलामत सुटतात. अशावेळी साडेतीनशे वर्षापूर्वी छत्रपती शिवरायांनी राबविलेल्या स्त्रीविषयक धोरणांची त्यांनी केलेली अंमलबजावणी पाहता सद्यस्थितीत शिवरायांच्या त्या कडक कायदेकानूंची आज समाजाला गरज असल्याचे प्रकर्षाने वाटते.

### *संदर्भ*


1. ;डॉद्ध. पवार जयसिंगराव , शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे , सुमेरू प्रकाशन डोबिंवली एप्रिल 2005 पृ 2
2. हनवते प्रेम , शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक. प्रकाशिका सौ. स इ शेख ॲमिटी पब्लिकेशन कोल्हापूर डिसें 1994 पृ 35
3. पानसरे गोविंद शिवाजी कोण होता.प्रकाशक प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मयगृह, मुंबई प्रथम आवृत्ती 1988 जानेवारी 2006 पृ 14, 15
4. कुलकर्णी अ. रा. मराठयांचा इतिहास–सामाजिक आर्थिक जीवन अभ्यास राजहंस प्रकाशन पुणे 15 ऑगस्ट, 1993 पान 193
5. ढावरे ज्ञानेश्वर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीचा वाद सुगावा प्रकाशन पुणे 30 मे 2004 पृ 9
6. देशमुख मा. म. युगप्रवर्तक शिवराज आणि मराठयांची शौर्यगाथा विश्वभारती प्रकाशन सीताबर्डी नागपूर 19999 पृ 56
7. कुलकर्णी अ. रा मराठयांचा इतिहास खंड पहिला कॉण्टिनेन्टल प्रकाशन पुणे 30 1984 पृ 363
8. उपरोक्त पृ. 135, 136
9. देशमुख मा. म. शिवराज्य शिवभारती प्रकाशन नोव्हें 1999 पृ. 12

10. शिंदे अशोकराव स्वराज्याचा मागोवा सहयाद्री प्रकाशन इस्लामपूर पृ 7
11 उपरोक्त पृ 10
12 देशमुख मा. म युगप्रवर्तेक शिवराज आणि मराठयांची शिवगाथा पृ 19
13. उपरोक्त पृ 55
14. केळस्कर कृष्णराव अर्जुन छत्रपती शिवाजीमाहराज (चरित्र) वरदा पुणे – पहिली आ 1906 दुसरी 1991 पान – 357
15. आठवले सदाशिव शिवाजी आणि शिवयुग अजब पुस्तकालय कोल्हापूर 1971 पृ 154
16. पानसरे गोविंद पृ. 14
17. केळस्कर कृष्णराव अर्जुन पृ. 149
18. कोकाटे श्रीमंत विश्वबंध छत्रपती शिवाजी महाराज मराठा सेवा संघ सांगली 19 फेब्रूवारी 2001 पृ. 87
19 केळस्कर कृष्णराव अर्जुन. पृ. 259

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org